


॥असाध्य ते साध्य करिता सायास॥

Council of Education's

**NIGHT COLLEGE OF ARTS AND COMMERCE, KOLHAPUR**

(Affiliated to Shivaji University, Kolhapur)

NAAC Reaccredited with 'A' Grade (CGPA-3.12)


Date: **23/12/2025**

## Activity Report on 'Self-composed Poetry Writing Competition'

Organized by

**Department of Marathi**

2025 - 2026

| | |
|---|---|
| **Date of Activity Organized** | 23/12/2025 |
| **Name of the Coordinator** | Dr. Arun Shinde |
| **Names of the Expert or Resource persons** | Dr. Arun Shinde |
| **No. of Participant (Students + staff)** | 12 |
| **Objectives of the Activity** | To foster original poetic talent among students in memory of Deshbhakt Ratnappanna Kumbhar. |
| **Outcomes of the Activity** | Twelve students showcased their creative poetic abilities. |

प्रा.डॉ.अरुण शिंदे
मराठी विभाग प्रमुख
नाइट कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स,कोल्हापूर

PRINCIPAL,
NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE,
KOLHAPUR

Scanned with OKEN Scanner

# आई - "न सांगता केलेला त्याग"

ती कधी व्यासपीठावर उभी राहिली नाही,
तरीही आमचं आयुष्य तिच्याच भाषणावर
उभं आहे.
नाव कुठे कोरलं नाही तिने,
पण प्रत्येक यशामागे तिची सही आहे.

स्वप्नं होती तिच्याही डोळ्यांत,
पण आमच्या झोपेसाठी तिने जागणं निवडलं,
स्वत:चं आयुष्य अर्धवट ठेवून
आमचं भविष्य तिने पूर्ण केलं.

आईने कधी 'मी' असं म्हटलंच नाही,
ती नेहमी 'आपण' यातच विरघळली,
आणि म्हणूनच आज आम्ही उंच उभे आहोत,
कारण ती स्वत: झुकत गेली.

जर देव शोधायचा असेल कोणी,
तर मंदिरात जाऊ नका,
आईच्या न सांगितलेल्या त्यागात
देव स्वत: झुकून उभा आहे.

नाव :- समिक्षा मच्छिंद्रनाथ पाटील
वर्ग :- B.A.-I
मोबाईल नंबर :- 8482819688

Scanned with OKEN Scanner

DATE

# स्वप्नांची धग

धूळ उडाली पायवाटेवर,
तरी पाऊल माझं थांबत नाही ....
स्वप्नांची धग पेटल्यावर
अंधारालाही उजेड दिसत नाही.

हातात नसते काही तरी,
पण मनात वादळ उठलेलं ...
यशाच नाव घेऊन पुढे जाताना
हरणंही कधी जिंकलेलं.

डोळ्यात स्वप्नं – साधी, सरळ,
पण हृदय मात्र हट्टाग्रही ...
प्रतिकूलतेतही उभा राहणं
हेच खरं धैर्य अंगी.

वादळं आली, दिशा हरवली,
तरी एक किरकिरी आशा उरते ...
जिद्दिची बिजं जिथे रुजतात
तिथे यशाची फुलं नक्कीच फुलते.

म्हणूनच चालतो वाटेवर माझ्या,
अडथळ्यांना सलाम करत ...
स्वप्न लहान नाहित —
मीच मोठा होतो त्यांना जगत.


नाव :- समिक्षा मच्छिंद्रनाथ पाटील
वर्ग :- B.A.1डी
मोबाईल नंबर :- ९५९२९७१६९९

# मायेचा हात

तो हात सोन्याचा नव्हता,
तरीही भविष्य घडवत होता,
खडबडीत बोटांतून
स्वप्नांची बीजं पेरत होता.

त्या हाताला रंग नव्हता,
पण त्यात सृष्टीची भाषा होती,
माती चिकटलेली नखांखाली
संघर्षाची स्वाक्षरी होती.

राजवाडे उभे राहिले,
ज्याच्या न दिसणाऱ्या कष्टावर,
इतिहासाने मुकाट मान टाकली
त्या मातीच्या हातावर.

तो हात कधी पुस्तकात नव्हता,
नाही तो व्यासपीठावर दिसला,
पण प्रत्येक यशाच्या मुळाशी
तो शांतपणे उभा राहिला.

जखमा त्याच्या ओळखीच्या,
वेदना त्याच्या सवयीच्या,
तरीही तो हात थांबला नाही
कारण भूक होती उद्याची.

आज आम्ही उंच मानेनं उभे आहोत,
स्वच्छ हात, कोरी स्वप्नं घेऊन,
पण विसरू नका —
ही उंची मातीच्या हातावर उभी आहे.

जो हात मातीचा म्हणून
आपण मागे सारतो,
तोच हात खरं सांगतो —
माणूस माणूस कसा घडतो.
माणूस माणूस कसा घडतो.

नाव :- समिक्षा मच्छिंद्रनाथ पाटील
वर्ग :- B.A.१ ला
मोबाईल नंबर :- 8482879688

DATE / /

# मी अजूनही उभा आहे

मी पडतो रोज...
पण पडणं मोजत नाही लोकांसमोर,
कारण माझ्या गुडघ्यांपेक्षा
माझ्या स्वप्नांना जास्त ताकद आहे.

मी गर्दीत उभा आहे,
पण आवाज माझा वेगळा आहे,
इथे प्रत्येकजण हुशार आहे,
पण प्रश्न विचारणारा थोडाच आहे.

मला नशिबावर विश्वास नाही,
मी मेहनतीला देव मानतो,
कारण नशिब बदलतं शब्दांनी,
पण भविष्य घडतं घामाने.

लोक म्हणतात —
"आजची पिढी भरकटली आहे"
पण त्यांना कोण सांगेल,
आम्ही फक्त नवे रस्ते शोधतोय.

मी अपयशाला घाबरत नाही,
कारण तेच मला शिकवतं,
यश कसं उंच असतं
आणि माणूस कसा खरा असतो.

आज मी लहान वाटतो कदाचित,
पण उद्या इतिहासात नाव असेल,
कारण मी हार मानणाऱ्यातला नाही,
मी लढणाऱ्यातला आहे.

आणि म्हणूनच सांगतो शेवटी —
मी अजूनही उभा आहे,
तुटलेला नाही...
फक्त घडतोय...

नाव :- समिक्षा मच्छिंद्रनाथ पाटील
वर्ग :- B.A. Ist
मोबाईल नंबर :- 8482879688

Rajdhani
DATE / /

# * आईची उणीव *

आज सहज गेले माहेरी
अंगणात तुळस होती बहरणारी
पण घरात आई नव्हती
तोंडावरून हात फिरवणारी
घरांमध्ये सगळ्यांची ये जा होती
पण मी आले म्हणून पळत
येणारी माझी माय नव्हती
गोठ्यामध्ये हंबरणारी गाय होती
पण माझ्या बरोबर प्रेमाने
बोलणारी माझी माय नव्हती
घरामध्ये मी आले म्हणून जेवणाचा थाट होता
बसायला पाट होता
पण मायेने जेवायला
वाढायला माझ्या आईचा हात नव्हता
दादा वहिणीचा खूपच आग्रह होता
पण ताटामध्ये काय काय वाढले आहे
ते पहायला माझ्या आईचा चेहरा नव्हता
साडी घेतली चोळी घेतली
माहेर पणाची उणीव नाही भासली
पण हे बघण्यासाठी माझी माय कुठे होती
सगळा पाहुणचार छान झाला
गप्पा गोष्टी करण्याचा योग आला
सगळी एकत्र बसली होती पण
जिच्या मांडीवर डोके ठेवून विसावा घ्यायचा
ती मांडीच तिथे नव्हती
गप्पा संपल्या संसारी जाण्याची वेळ आली
पण पाठवणी करणारी माझी मायच तिथे नव्हती
घरातून बाहेर पडल्यावर हात उंचावून
परत ये म्हणणारी माझी माय नव्हती, माझी माय नव्हती.

Scanned with OKEN Scanner

## * परीक्षा *

देवा आहेस का रे जागा
बी.ए चा पेपर आहे परवा
वय गेले आहे माझे उलटून
पण बी.ए करण्याची
हौस बसली आहे उडून
माझे म्हणने जरा ऐकशील का
इंग्रजीच्या पेपरला शिक्षक बनून येशील का
मी नाही रे कॉपी करणार
रिकाम्या जागा तेवढ्या
तू मला सांगणार
नाही तर मग असं कर जरा
सरांची चुकवून ये ना रे देवा जरा
प्रसाद म्हणून गोड-गोड खाऊ देतो ना तुला
पेपर मधला अभ्यास सांग ना जरा
घरातील लोकांचा विश्वास नाही रे मला
ते कधी म्हणत नाहीत पेपर सोपा जाईल तुला
सगळ्या गोष्टीमध्ये वयाचा झालाय रे घोटाळा
अहो चा डबा, मुलांचा डबा, सासुबाईंचा नाष्टा
बाबांचा दवाखाना यामध्ये वेळ नाही रे मला
काय सांगू रे देवा तुला
बी.ए चा पेपर जवळ आला

नाव:- पल्लवी यशवंत कोराणे
वर्ग :- B.A.I
मोबाईल नंबर :- 9359497163

Scanned with OKEN Scanner

Rajdhani
DATE / /

# * शेतकऱ्याची व्यथा *

अरे शेतकरी माणसाचे जीवन किती असुरक्षित
आहे रानावनात काम करत असताना कधी
विंचू चावतो तर कधी मदू चावतो तर कधी
साप चावतो आहे काट माझा शेतकरी राजा
सुखी नोकरदाराला विमा पॉलिसी असते
माझ्या शेतकरी माणसाला मात्र सरकारी दवाखान्याची वारी
असते शेतीच्या पिकाला पिक विमा आहे
पण शेतामध्ये कष्ट करणाऱ्या माझ्या शेतकरी
राजाला गळाला मात्र गळफास आहे
पाऊस आला पुर आला पिक वाहून गेले
तरी म्हणतो कसा हा निसर्गाचा घाला आहे
माझ्या नशीबाचा फेरा आहे
न घाबरता उभा राहतो
आणि लाखो लोकांची पोट भरतो
पण तो कधीच सुखी नसतो
रात्र गेली दिवस गेला शेतकरी राजा राबून मेला
माझा शेतकरी कधीच दुःखी नाही झाला
व्यापारी मात्र त्याच्या जीवावर मालामाल झाला
पण शेतकरी राजा कधी दुःखी झाला नाही
अश्या या शेतकरी राजाला लाख-लाख सलाम

नाव :→ पल्लवी यशवंत कोराणे
वर्ग :→ B.A.I
मोबाईल नंबर :→ 9359497163

Scanned with OKEN Scanner